# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन
# राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

---

## *कंत्राटी तत्वावर पदे भरण्याबाबतची जाहिरात *

जाहिरात क्र. : रातुमनावि /  दिनांक :

## Interview

राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात मुलाखती च्या माध्यमातून **कंत्राटी पध्दतीवर तात्पुरत्या स्वरूपात खालील (६) सहा पदे व Ph.D Fellow चे (०२) पदे**

| अ. क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | कालावधी | Fellowship/ मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | **Ph.D Fellow** | २ दोन | ३ वर्ष | प्रति माह **रू.३५,०००/–** + घरभाडे |
| २. | **संशोधन सहयोगी कंत्राटी पध्दती** | २ दोन | ६ महिने | एकत्रित मानधन **रू. १५,०००/–** (रूपये पंधरा हजार) प्रति माह |
| ३. | **संशोधन सहाय्यक कंत्राटी पध्दती** | ४ चार | ६ महिने | एकत्रित मानधन **रू. १०,०००/–** (रूपये दहा हजार) प्रति माह |

विद्यापीठात मुलाखतीच्या माध्यमातून भरावयाच्या वरिल पदांच्या मुलाखती **गुरूवार** दिनांक **१० ऑक्टोबर, २०२४** रोजी दुपारी **०२:३० वाजता** आयोजित केलेल्या आहेत.

**स्थळ**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी भवन,
वि.भि. कोलते वाचनालयाच्या बाजूला, रामदासपेठ, नागपूर ४४००१०.

**टिप :– सर्व उमेदवारांनी मुलाखतीला नियोजित वेळेच्या अर्धा तास आधी उपस्थित राहावे.**

Scanned with OKEN Scanner

**Ph.D. (Fellow) पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, व पात्रतेच्या इतर निकषासंबंधी विस्तत माहिती खालीलप्रमाणे:–**

**१. (Ph.D.) Fellow (डॉ. आंबेडकर प्रतिष्ठान, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या कडून फेलोशीप मंजूर व अनुदानित आहे. )**

| | | |
|---|---|---|
| **पदसंख्या** | | ०२ (दोन ) |
| **कालावधी** | | ०३ वर्ष |
| **एकत्रित मानधन** | | प्रति माह **रू.३५,०००/–** + घरभाडे |
| **शैक्षणिक अर्हता व अनुभव** | | १. या साठी अर्जाचा विहीत नमूना नसून साध्या कागदावर अर्ज करून शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्रे संलग्नित करावे.<br>२. मानव विज्ञान शाखेतील कोणत्याही पदव्युत्तर पदवी संबंधीचे निकष ज्यांनी पूर्ण केले आहेत.<br>३. **Ph.D.** साठी आवश्यक असणारी **UGC** व रा.तु.म. यांनी निर्धारीत केलेली पात्रता धारण केली असावी. |
| **प्राधान्य** | | १. प्राध्यापक, डॉ. आंबेडकर अध्यासन यांच्याकडे **Ph.D.** साठी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर **Fellowship** साठी पात्र राहतील.<br>२. **Ph.D. Fellowship केवळ (०२ ) दोन** विद्यार्थ्यांना देण्यात येईल.<br>३. **SC/ST/OBC** and marginalized candidates ला **Ph.D. Fellowship** साठी प्राधान्य देण्यात येईल. |

**कंत्राटी तत्वावर भरावयाच्या वरील पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, व पात्रतेच्या इतर निकषासंबंधी विस्तत माहिती खालीलप्रमाणे:–**

**२. संशोधन सहाय्यक (डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन )**
**(Research Assistant)**

| | | |
|---|---|---|
| **पदसंख्या** | | ०४ (चार ) |
| **कंत्राटी कालावधी** | | ०६ महिने |
| **एकत्रित मानधन** | | रू. १०,०००/– |
| **शैक्षणिक अर्हता व अनुभव** | | १. मानव्यशास्त्राशी संबंधित कोणत्याही एका विषयात किमान ५५ टक्के गुण मिळवून प्राप्त केलेली पदव्युत्तर पदवी.<br>२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञान चळवळीवर लेखण/संशोधनाचा अनुभव. |
| **प्राधान्य** | | १. डॉ. आंबेडकरांच्या विचारांवर तत्वज्ञानावर पदव्युत्तर पदवी/एम.फिल/ पीएच.डी.<br>२. दलित इतिहासात संशोधन करण्याऱ्यास प्राधान्य<br>३. एससी/एसटी/ओबीसी उमेदवारास प्राधान्य |
| **संशोधन सहाय्यक संशोधन कर्तव्य आणि जबाबदारी** | | १. संशोधन कार्यात सहाय्य व अध्यासनाच्या उद्दिष्टपूर्तीकरिता आवश्यक ती कार्य करणे.<br>२. अध्यासनाच्या प्रमुखाने नेमून दिलेली संशोधन सर्वेची कार्य करून त्यांच्या सर्व कार्यात मदत करणे..<br>३. अध्यासन प्रमुखाच्या अनुपस्थितीत त्यांनी दिलेल्या अधिकार क्षेत्रातील सर्व कार्ये करणे. |

Scanned with OKEN Scanner

**कंत्राटी तत्वावर भरावयाच्या वरील पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, व पात्रतेच्या इतर निकषासंबंधी विस्तत माहिती खालीलप्रमाणेः—**

| **३. संशोधन सहयोगी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन )<br>( Research Associate)** | | |
|---|---|---|
| **पदसंख्या** | | ०२ (दोन ) |
| **कंत्राटी कालावधी** | | ०६ महिने |
| **एकत्रित मानधन** | | रू. १५०००/— |
| **शैक्षणिक अर्हता व अनुभव** | | १. मानव्यशास्त्राशी संबंधित कोणत्याही एका विषयात किमान ५५ टक्के गुण मिळवून प्राप्त केलेली पदव्युत्तर पदवी.<br>२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञान चळवळीवर लेखण/संशोधनाचा अनुभव |
| **प्राधान्य** | | १. डॉ. आंबेडकरांच्या विचारांवर तत्वज्ञानावर पदव्युत्तर पदवी/ एम.फिल ./ पीएच.डी.<br>२. दलित इतिहासावर संशोधन करण्या—यास प्राधान्य<br>३. एससी/एसटी/ओबीसी उमेदवारास प्राधान्य |
| **संशोधन सहयोगी कर्तव्य आणि जबाबदारी** | | १. संशोधन कार्यात सहाय्य व अध्यासनाच्या उद्घिष्टपूर्तीकरिता आवश्यक ती कार्य करणे.<br>२. संशोधन सहाय्यक सोबत समन्वय करून संशोधन कार्यावर भर देणे.<br>३. अध्यासनाच्या प्रमुखाने नेमून दिलेली संशोधन सर्वेची/मुलाखती कार्य करून त्यांच्या सर्व कार्यात मदत करणे.<br>४. अध्यासन प्रमुखाच्या अनुपस्थितीत त्यांनी दिलेल्या अधिकारक्षेत्रातील सर्व कार्ये करणे. |

Scanned with OKEN Scanner

वरील सर्व पदांकरीता, पात्र उमेदवारांनी विद्यापीठाच्या http://WWW.dbacnagpur.org. या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या विहित अर्जाच्या नमुन्यात माहिती भरून आवश्यक सहपत्रांसह आवेदनपत्र सर्व संबंधित प्रमाणपत्रे इत्यादींच्या स्वच्छ आणि सुवाच्छ स्वयं साक्षांकित प्रतींच्या एकूण **सहा प्रतीत** सेट सोबत आणावे. विद्यापीठाच्या वेबसाईटवर अपलोड केलेल्या वेळापत्राकानूसार मुलाखतीसाठी उपस्थित असतांना सर्व माहिती (जन्म तारीख, पात्रता, अनुभव इ.) यांच्या मुळ प्रती सह उपस्थित राहावे.

## अर्जदारासाठी सुचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, इत्यादी बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा.

२) सर्व पदांसाठी उमेदवारांस मराठी, इंग्रजी, व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) आवेदकांनी विद्यापीठाच्या http://WWW.dbacnagpur.org. या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्येच टंकलिखित,हस्तलिखित किंवा संगणकीय प्रिंट केलेला अर्ज परिपूर्ण भरलेला अर्जाचा नमुना व संबंधित प्रमाणपत्राांच्या स्वप्रमाणित **( Self attested)** प्रती एकूण सहा प्रतीत सादर करावा. अर्जाच्या विहित नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/ रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे. अर्जदाराने आवेदनपत्रातील ''प्रपत्र–अ'(**Proforma** ) **A** मध्ये माहिती भरणे अत्यावश्यक आहे. सदर प्रपत्रात माहिती सादर न केल्यास आपल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

४) मुलाखतीस उपस्थित राहतेवेळी उमेदवाराने सर्व आवश्यक व संबंधित प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

५) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यवसायिक अनुभव, जात, जातवैधता, इत्यादी संबंधी आवश्यक प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वप्रमाणित **(Self attested)** प्रती जोडाव्यात. **अर्जासोबत मूळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.**

६) सुवाच्च अक्षरात नसलेले, अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत नसलेले, अर्जासोबत आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वप्रमाणित (**Self attested**) प्रती नसलेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच **सर्व प्रमाणपत्रांसह सहा प्रतींमध्ये नसलेले अर्ज अवैध ठरविल्या जातील व विचारात घेतल्या जाणार नाही.**

७) **अर्जदाराने आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव हे मुलाखतीचे तारखेपर्यंत धारण केलेले असावे.**

८) अर्जाच्या छाननीअंती अर्जदार अपात्र ठरल्यास अर्जदारास मुलाखतीला समोर जाता येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

९) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधित अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकीय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारांस अपात्र ठरविल्या जाईल.

१०) मुलाखतीस आलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

११) विद्यापीठ प्रशासनाद्वारे आयोजित मुलाखतीस येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरिता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा अनयुक्ती उपरांत उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ति तात्काळ रद्द करण्यात येईल व असा उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

१३) जाहिरातीत बदल किंवा दुरूस्ती करण्याबाबत, तसेच संपूर्ण जाहिरात रद्द करण्याबाबतचे अधिकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

१४) जाहिरातीत नमूद केलेल्या पदांसंदर्भात कोणतेही वाद निर्माण झाल्यास सर्व वाद नागपूरातील सक्षम न्यायालयाच्या अखत्यारीत राहतील.

विभागप्रमुख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन विभाग,

Scanned with OKEN Scanner